आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
६ जून २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- १८ व्या लोकसभेची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानं लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात
- केंद्रात सत्तास्थापनेच्या दृष्टीनं गाठीभेटींना वेग, राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाची उद्या बैठक
- गाझामधे इस्त्राएलच्या हवाई हल्ल्यात ३० पॅलेस्टिनी ठार

  **आणि**
- ISSF विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत सरबज्योत सिंगला १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक

<><><><><>

निवडणूक आयोगानं आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेवून १८ व्या लोकसभेत निवडून आलेल्या सदस्यांची यादी असलेली अधिसूचनेची प्रत त्यांच्याकडे सुपूर्द केली. याबरोबरच निवडणूक जाहीर झाल्यापासून लागू झालेल्या निवडणूक आचारसंहितेचा कालावधी संपुष्टात आला आहे.

ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया यशस्विरित्या पूर्ण केल्याबद्दल राष्ट्रपतींनी निवडणूक आयोगाचं अभिनंदन केलं. या लोकसभा निवडणुकीत देशातल्या ६५ पूर्णांक ७९ शतांश टक्के मतदारांनी मतदान केल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली. सर्वाधिक ८४ टक्क्यांहून अधिक मतदान लक्षद्वीपमध्ये झालं. आसाम आणि त्रिपुरामध्ये ८१ टक्क्यांहून अधिक मतदान झालं. बिहारमध्ये सर्वात कमी म्हणजे ५६ पूर्णांक १९ शतांश टक्के आणि उत्तर प्रदेशात सुमारे ५७ टक्के मतदारांनी

मतदान केलं.

दरम्यान, राज्यातल्या राज्यसभेच्या एका जागेसाठी आणि केरळमधल्या ३ जागांसाठी अधिसूचनाही आज जारी करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्या राजीनाम्यामुळे राज्यातली जागा रिक्त झाली आहे. यासाठी १३ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील आणि गरज पडल्यास २५ जून रोजी मतदान होईल.

**<><><><><>**

केंद्रात सत्तास्थापनेसाठी हालचाली सुरु असून राजकीय भेटीगाठी आणि चर्चांना वेग आला आहे.

भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी आज पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांची बैठक झाली. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंग, पियुष गोयल, प्रल्हाद जोशी, मनसुख मांडवीय, अश्विनी वैष्णव यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते बैठकीला उपस्थित होते. सध्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांची बैठक सुरू आहे.

जनता दल संयुक्तच्या नेत्यांची बैठक आज दिल्लीत नीतीशकुमार यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सदस्य पक्षांच्या बैठकीत नरेंद्र मोदी यांची रालोआच्या नेतेपदी एकमताने निवड झाली. रालोआच्या संसदीय पक्षाची बैठक

उद्या नवी दिल्लीत होणार असून भाजपा, तेलगु देसम, जनता दल संयुक्त, लोकजनशक्ती पार्टी, शिवसेना इत्यादी घटक पक्षांचे नवनिर्वाचित खासदार त्यात सहभागी होतील.

दरम्यान, लोकजनशक्ती पार्टीचे अध्यक्ष चिराग पासवान यांच्याशी विरोधी पक्षांनी संपर्क साधल्याचं वृत्त पासवान यांनी फेटाळलं आहे.

<><><><><>

नव्या रालोआ मंत्रिमंडळात सहभागी होताना संयुक्त जनता दलाने मंत्रिपदासाठी कोणतीही अट घातली नसून बिहारला विशेष दर्जा द्यावा, ही आपली मागणी असल्याचं संयुक्त जनता दलाचे ज्येष्ठ नेते के. सी.त्यागी यांनी आज आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. सरकार स्थापनेच्या संदर्भात भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह हे रालोआतल्या घटक पक्षांशी चर्चा करत असल्याचंही त्यागी यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांचा सलग तिसरा शपथविधी येत्या ९ तारखेला होण्याची शक्यता असून, त्यादृष्टीनं तयारी सुरु आहे. नवी दिल्लीतल्या राष्ट्रपती भवनात होणाऱ्या या शपथविधी समारंभाच्या वार्तांकन आणि प्रसारणासाठीच्या तयारीचा आढावा माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू, प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, आकाशवाणीच्या महासंचालक मौशुमी चक्रवर्ती, दूरदर्शनच्या महासंचालक कांचन प्रसाद इत्यादी ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी आज घेतला.

<><><><><>

युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देर लेयेन यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल आज फोनवर अभिनंदन केलं. तसंच जगातली सर्वात मोठी निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे राबवल्याबद्दल त्यांनी भारतीय लोकशाहीचं कौतुक केलं. तर शुभेच्छा दिल्याबद्दल नरेंद्र मोदी यांनी वॉन देर लेयेन यांचे आभार मानले आहेत.

ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बेनिज यांनीही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं लोकसभा निवडणुकीतल्या विजयाबद्दल फोनवर अभिनंदन केलं. मोदी यांनी या शुभेच्छांबद्दल अल्बेनिज यांचे आभार मानले.

<><><><><>

इंडिया आघाडीच्या नेत्यांच्या आज नवी दिल्लीत भेटी-गाठी सुरु आहेत. तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी आणि नेते डेरेक ओब्रायन यांनी समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी दिल्लीतल्या त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. आम आदमी पक्षाचे नेते राघव चड्ढा यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांची भेट घेतली.

<><><><><>

राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन १० जून ऐवजी २७ जूनपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य सरकारनं आज घेतला. मुंबईत मंत्रीमंडळाची बैठक झाल्यानंतर वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ही माहिती दिली. उद्धव ठाकरे यांनी

राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी व्हावं यासाठी भाजपाच्या नेत्यांनी ठाकरे यांना विनंती केल्याची चर्चा मुनगंटीवार यांनी फेटाळून लावली.

दरम्यान, उपमुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडनवीस आज दिल्लीला रवाना झाले.

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर शिवसेनेच्या सर्व नवनिर्वाचित खासदारांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत चर्चा केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांनीही आज मुंबईत उद्धव ठाकरेंची भेट घेतली. लोकसभा निवडणुकीतल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कामगिराचा आढावा घेण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी आज मुंबईत पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांची बैठक घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसचे काही आमदार शरद पवार यांच्या संपर्कात असल्याचं वृत्त प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी फेटाळून लावलं.

राज्यात केंद्र सरकारपेक्षा राज्य सरकारच्या विरोधात अधिक नाराजी असून येत्या विधानसभेत सत्ताधाऱ्यांना याचा मोठा फटका बसेल, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटलं आहे.

सांगलीतून अपक्ष म्हणून निवडून आलेल्या विशाल पाटील यांनी काँग्रेस पक्षाला पाठिंबा दिला आहे. काँग्रेसच्या खासदारांची उद्या मुंबईत बैठक आहे.

**<><><><><>**

ओदिशा विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवल्यानंतर मुख्यमंत्री पदासाठी भाजपा विविध नेत्यांच्या नावांचा विचार करत आहे.  त्यात केंद्रीय मंत्री

ज्युआल ओराम, धर्मेंद्र प्रधान, तसंच भारताचे माजी नियंत्रक आणि महालेखापाल गिरिषचंद्र मुर्मू यांची नावं आघाडीवर आहेत, मात्र यापेक्षा वेगळं नावही अचानक पुढं येण्याची असल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करण्यासाठी ओदिशातल्या सर्व २० नवनिर्वाचित खासदारांना उद्या दिल्लीला बोलावलं आहे.

<><><><>

गाझामधे इस्त्राएलच्या हवाई हल्ल्यात ३० पॅलेस्टिनी मारले गेले. मध्य गाझा पट्टीत नुसरत कँप इथं एका शाळेच्या इमारतीत लावलेल्या विस्थापित छावणीवर इस्त्राएली लढाऊ जेट विमानांनी क्षेपणास्त्र डागली. या छावणीत हमासच्या दहशतवाद्यांनी आसरा घेतला होता, ते या हल्ल्यात मारले गेले असल्याचं इस्त्राएलचं म्हणणं आहे.

<><><><>

जर्मनी मधल्या म्युनिक इथं सुरू असलेल्या ISSF विश्वचषक नेमबाजी स्पर्धा २०२४ मध्ये भारताचा नेमबाज सरबज्योत सिंगने आज पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात २४२ पूर्णांक ७ गुण मिळवत सुवर्णपदक जिंकलं. चीनच्या शुएहांग बुने २४२ पूर्णांक ५ गुणांसह रौप्यपदक, तर जर्मनीच्या रॅाबिन वॅाल्टरने २२० गुणांसह कांस्यपदक पटकावलं.

<><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन भागीदार मॅथ्यू एब्डेन उपांत्य फेरीत पराभूत झाले. इटालियन जोडी सिमोन बोलेली आणि अँड्री वावासोरी यांनी त्यांना ७-५,२-६,६-२ असं नमवलं.

<><><><><>

भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन याने इंडोनेशिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेत जपानच्या केन्ता निशिमोतो याचा पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. जकार्ता इथं झालेल्या सामन्यात लक्ष्य सेनने निशिमोतोला २१-९, २१-१५ अशी मात दिली.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या चामोर्शी तालुक्यात आज वेगवेगळ्या ठिकाणी वीज पडून दोन जणांचा मृत्यू, तर दोनजण जखमी झाले.जखमींवर गडचिरोली इथल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

<><><><><>

राज्य विधानमंडळाचं उच्चस्तरीय शिष्टमंडळ सध्या रशियन फेडरेशनच्या निमंत्रणावरून सेंट पिटर्सबर्ग इथं अभ्यास दौऱ्यावर गेलं आहे. दोन्ही देशांच्या विधानमंडळांमध्ये आज सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. हा सामंजस्य करार ऐतिहासिक आणि भविष्यकालीन दृढ संबंधांची ग्वाही देणारा असल्याचं  महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष आणि अभ्यासदौरा शिष्टमंडळाचे नेते राहुल नार्वेकर यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

मुंबईत पवई इथल्या भीमनगर परिसरात अतिक्रमण विरोधी कारवाई दरम्यान, २५ जण जखमी झाले. त्यात महापालिकेचे ५ अभियंते, ५ मजूर आणि १५ पोलिसांचा समावेश आहे. या सर्वांची भेट पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी घेतली.